# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड डी.सी.आर. दिनांक २०/०६/२०१८**

**" स्थानिक गुन्हे शाखा यांचेकडुन काळ्या बाजारात विक्री करण्यासाठी केलेला 1750 लिटरचा रॉकेलचा साठा जप्त "**

दिनांक 20/06/2018 रोजी मा. पोलीस निरीक्षक श्री सहाणे साहेब यांचे आदेशाने सहायक पोलीस उप निरीक्षक श्री पांडुरंग भारती व त्याचे इतर कर्मचारी असे नंदीग्राम सोसायटी, नांदेड या भागात गुन्हेगार वॉच पेट्रोलिंग करीत असताना महेंद्रसिंग समशेरसिंग दिगवा यांचे जागेत विटा रचुन केलेल्या खोलीत इसम नामे 1) महमंद इसार पि. महमंद सुलतान, 2) राजकुमार देविसिंग ठाकुर दोघे रा. नांदेड हे लोखंडी टाकीमधील घरगुती वापराचे निळ्यारंगाचे रॉकेल प्लॅास्टिक कॅनमध्ये भरीत असताना मिळुन आले. सदर इसमाचे ताब्यात शासनाकडून वितरीत होणारे घरगुती वापराचे निळ्या रंगाचे रॉकेलच्या दोनशे लिटर क्षमतेच्या सात टाक्या पुर्ण भरलेले व पंन्नास लिटर क्षमतेच प्लॅास्टिकचे सात कॅन पुर्ण भरलेले असे एकुण 1750 लिटर रॉकेल किमती 1,05,000/- रुपयाचे मिळुन आले. सदरचा रॉकेल साठा हा शेख बाबा शेख मुक्तार रा. पिरबुऱ्हान नगर नांदेड याचा असुन, सदर रॉकेलचा साठा व मिळुन आलेले आरोपी पो. स्टे. विमानतळ नांदेड यांचे ताब्यात दिले आहेत व सदर तीन्ही आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन विमानतळ, नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कामगिरी मा. पोलीस अधिक्षक, श्री. चंद्रकिशोर मीणा व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश शिंदे, श्री. राजेंद्र सहाणे पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नांदेड यांचे मार्गदर्शना खाली सपोनि श्री पी. डी. भारती, पोलीस हवालदार दत्ता वाणी, राजु पांगरेकर, तानाजी येळगे, व्यंकट गंगुलवार, शेख जावेद, शेख हिफजुर रहेमान, गजानन बयनवाड, मोतीराम पवार यांनी बजावली आहे.

पोलीस निरीक्षक<br>
स्था.गु. शा. नांदेड